ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 9 | ISSUE - 2 | OCTOBER - 2022

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# महाराज सयाजीराव गायकवाड यांचे अस्पृश्यतानिवारणाचे विचार आणि कार्य



डॉ. सचिन ज्ञानेश्वर मोरे
सहयोगी प्राध्यापक , इतिहास विभाग,
अहमदनगर महाविद्यालय, अहिल्यानगर.

**गोषवारा:**

भारतीय समाज व्यवस्थेचा विचार करता असे दिसून येते की, विषमता हे या समाज व्यवस्थेचे एक अविभाज्य अंग आहे त्यामुळे समाजसुधारकांनी ही विषमता नष्ट करून समता स्थापन करण्याचा प्रयत्न केला. प्रस्तुत शोधनिबंधात महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या सामाजिक सुधारणेमधील अस्पृश्यतानिवारण या घटकाचा संशोधनात्मक आढावा घेतला आहे त्यांनी या सुधारणा करीत असताना सामाजिक परंपरा, रूढी व शास्त्र यांचा चिकित्सक पद्धतीने विचार केलेला दिसतो. या सुधारणा करीत असताना एक राजा म्हणून त्यांनी घेतलेली भूमिका आणि त्यानुसार संस्थानातत्याविषयी केलेले कायदे ऐतहासिक दृष्ट्या महत्वाचे होते महाराजांची वैचारिक बैठक आणि सुधारणावादी कार्यामुळे तत्कालीन समाजव्यवस्थेत मूलगामी बदल होऊ लागला त्यामुळे त्यांच्या विचारांचे व कार्याचे योगदान अतुलनीय आहे.

समाज हा अनेकविध घटकांपासून बनलेला असतो. समाजाच्या अंतर्गत येणाऱ्या रूढी-परंपरा, चालीरीती, सवयी, अन्न, वेशभूषा, मनोरंजन, विवाहसंस्था, उत्सव, धर्म इ. समाजाचे अविभाज्य घटक आहेत. तसेच कुटुंबव्यवस्था, राज्यव्यवस्था, शासनव्यवस्था, शिक्षणव्यवस्था इ. समाजाच्या उपव्यवस्था असतात. समाजव्यवस्था ज्या स्वरुपाची असते तेच स्वरूप या घटकांना व उपव्यवस्थांनादेखील प्राप्त होते. समाज जर विषम पायावर उभा असेल तर वरील उपव्यवस्थादेखील विषमताग्रस्त राहतात. या सर्व घटकांच्या दृश्य आविष्काराच्या मूळाशी सामाजिक धारणा आणि सामाजिक तत्वज्ञान कार्यरत असते. हे घटक समाजाच्या उन्नतीसाठी जसे जबाबदार असतात, तसेच ते कालबाह्य झाले तर समाजाच्या अधोगतीलाही जबाबदार ठरतात. त्यामुळे समाजसुधारणेची गरज निर्माण होते परंपरागत भारतीय समाज चातुर्वर्ण्यव्यवस्था व अनेक जातींवर उभारल्याने तो विषमतेने ग्रासलेला आहे हे लक्षात घेऊन आधुनिक काळात भारतीय समाजसुधारकांनी समाजसुधारणेस सुरुवात केली सवंग समाजसुधारणेची कक्षा मोठी आहे त्यातील अस्पृश्यतानिर्मूलन या घटकावर येथे विचार केला आहे.

ब्रिटिश भारतात अस्पृश्यतानिर्मूलन कार्याचा अग्रक्रम म. फुले यांना मिळतो. समाजसुधारणेतील शिक्षण या घटकाची प्रभावी भूमिका ते जाणून होते. त्यामुळेच सन १८४८ व १८५२ मध्ये अनुक्रमे शूद्रातिशूद्र मुलींची आणि अस्पृश्य मुलांची शाळा सुरु करून त्यांनी प्रत्यक्ष कार्य सुरु केले. यानंतर महर्षी वि. रा. शिंदे, राजर्षी छ. शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा अनेक सुधारकांनी हे कार्य गतिशीलपणे पुढे नेले. या सुधारकांच्या मांदियाळीत बडोदेस्थित संस्थानिक श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड यांनी केलेला अस्पृश्यतानिर्मूलनाचा विचार व कार्य ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्वाचे आहे.त्यांच्या या कार्याचा प्रस्तुत शोधनिबंधामध्ये अभ्यास केला आहे.

सयाजीराव महाराजांचे चरित्र म्हणजे विविध सुधारणांचा इतिहासच होय. राजकीय प्रगतीसाठी सामाजिक-धार्मिक सुधारणा सयाजीरावांनी महत्वाची मानली. "कोणत्याही समाजाची राजकीय प्रगती ही त्याच्या सामाजिक व धार्मिक आचरणावर अवलंबून असते ज्या समाजात आपापसांत द्वेष, झगडे चालू आहेत त्याची राजकीयदृष्ट्या उन्नती होण्याची आशाच नको."[१] असे त्यांचे मत होते. "पूर्वीच्या धर्मशास्त्रात काय अनुसरून आहे, हे पाहून आमची सुधारणा व्हायची नाही.. सांप्रतकाळी कोणत्या सुधारणा केल्या पाहिजेत हे ठरविताना धर्मशास्त्राकडे विशेष लक्ष न देता जर आपण पूर्वानुभव आणि नवीन ज्ञान यांचे साहाय्य घेऊन सांप्रतकाळी कशात हित आहे हे सारासार विचार करून ठरविले तर विशेष फायदा आहे."[२] असे विचार मांडून सयाजीरावांनी आपल्या आधुनिक आणि विज्ञानवादी विचाराची पावतीच दिली. त्यांनी शिक्षण या घटकाचा सामजिक न्यायासाठी साधन म्हणून विचार केला होता. म्हणूनच, "विद्या ही एका व्यक्तीला मिळून फायदा नाही. ती सार्वत्रिक झाली पाहिजे...जन्माने कोणी मोठा नाही आणि उच्चनीच नाही. आपल्या देशातील महारापोरांपासून वरच्या पायरीपर्यंतच्या सर्व लोकांना शिक्षण देणे, हे राजाचे काम आहे."[३] असा विचार मांडीत कल्याणकारी राजाचे कर्तव्य नमूद केले. अस्पृश्यता निवारण्याचा सयाजीरावांनी चिकित्सक विचार केला होता 'भारत निराश्रित साहाय्यकारी मंडळी' च्या १९०९ सालीच्या एका समारंभात भाषण करताना सयाजीराव गायकवाड यांनी, "अस्पृश्यतेचा प्रश्न हा एक हिंदूंचाच असा विशिष्ट प्रश्न आहे व त्याचे पूर्ण आकलन फक्त हिंदूनाच करता येणे शक्य आहे इतरांना नाही. तरीसुद्धा हिंदूहिंदुतही या प्रश्नासंबंधी मतैक्य कुठे आहे"[४] असा मुलभूत प्रश्न निर्माण करून अस्पृश्यतेच्या रूढीमधील तथ्यच काढून टाकले होते वि. रा. शिंदे यांनी सयाजीराव गायकवाड यांच्या प्रेरणेतून अस्पृश्यता निवारण्याची कार्याची सुरुवात करून[५] १८ ऑक्टोबर १९०६ रोजी अस्पृश्य निवारणासाठी जागृतिची जडणघडण याच संस्कारात होती हे लक्षात घेतले पाहिजे.

सयाजीरावांना भारतातील जातव्यवस्थेचे आकलन होते. समाजात झालेल्या अध:पतनास जातिव्यवस्था कारणीभूत असल्याचे ते मानत. आर्यसमाजाचे लाहोर येथे १९०३ साली भरलेल्या समारंभातील भाषणात ते म्हणाले, "ह्या दुर्दैवी व बुद्धिहीन जातिसंस्थेइतके आपल्या समाजाचे नुकसान व अनर्थ दुसऱ्या कोणत्याही संस्थेने केला नाही. जातिसंस्थेने निर्माण केलेले हक्क केवळ जन्माने प्राप्त होणारे आहेत. त्यावर ते केव्हाही अवलंबून असू नयेत आकस्मिकरीत्या प्राप्त होणाऱ्या जन्मावर सामाजिक दर्जा केव्हाही अवलंबून असू नये हीन व दरिद्री जातींना मानवतेच्या स्वाभाविक हक्कापासून केव्हांही दूर लोटता कामा नये. आपल्या पूर्वजांच्या केवळ स्वर्थांधतेने हीन जातीचा एवढा अध:पात झाला ही मोठी लज्जेची गोष्ट आहे."[६] जातीभेदासंबधी केलेले हे विवेचन सयाजीरावांचे विचार किती प्रागतिक होते हे लक्षात आणून देणारे होते १९०४ साली त्यांनी अठराव्या सामाजिक परिषदेमध्ये केलेल्या भाषणात सयाजीराव म्हणतात, "जातीपासून होणारे वाईट परिणाम सर्व राष्ट्रावर होत आहेत. त्यातील एका अवयवावर होतात असे नाही. अर्थशून्य असलेल्या असंख्य क्षुद्र विधिनियमांनी एकेका व्यक्तीचे जीवित जखडून टाकिले आहे"[७] जातिभेदाच्या परिणामाविषयी त्यांचे हे गंभीर भाष्य वैयक्तिक स्तरापासून राष्ट्रीय स्तरापर्यंतचा आयाम पूर्ण करणारे आहे. मुंबई येथे १९१८ साली झालेल्या अखिल भारतीय अस्पृश्यता निवारक संमेलनातील अध्यक्षीय भाषणात महाराज म्हणाले, "सामाजिक नवजीवनाच्या रेट्यापुढे व शास्त्रीय ज्ञानासमोर अज्ञानमूलक गैरसमजुती व जातिअभिमान यांचा चिरकाल टिकाव लागणे शक्य नाही. अस्पृश्यता मनुष्यनिर्मित आहे, देवनिर्मित नाही."[८] असे विचार नमूद करून त्यांनी आशावाद निर्माण केला. अर्थात जातिव्यवस्थेचे त्यांनी केलेले चिंतन आणि शास्त्रीय ज्ञानावर असलेला विश्वास त्यामागे होता. १९३३ सालच्या भाषणात[९] वर्णजातींचे ऐतिहासिक तथ्यांच्या आधारे विवेचन करून त्यातील भ्रामक कल्पनांवर तार्किकतेने हल्ला केला. "बौद्धसिद्धांताप्रमाणे ब्राह्मण-क्षत्रियादिवर्ण, गुणकर्मावर समजला जातो, जन्मावरून नाही."[१०] असे उद्गार करीत महाराजांनी बौद्ध धर्मातील सामाजिक समतावाद अधोरेखित केला होता.

समाजसुधारणा म्हणजे धार्मिक रूढी आणि परंपरा यात करावयाच्या सुधारणा अशी महाराज सयाजीरावांची भूमिका होती. महाराज सयाजीराव हे केवळ तात्त्विक विचारवंतच नव्हते तर, कृतीशील समाजसुधारक होते. इ.स. १८७५ साली राज्याभिषेक झाल्यानंतर त्याच वर्षी त्यांनी स्वतंत्र शिक्षण खात्याची सुरुवात केली. सर्वांसाठी शिक्षण हे त्यांचे ब्रीद होते इ.स.१८८२ मध्ये बडोद्यातील आदिवासी आणि अस्पृश्य मुलांना सरकारी खर्चाने शाळा आणि वसतिगृह सुरु केले. पुढे या शाळा आणी वसतिगृहांमध्ये इतर मुलांनाही प्रवेश देण्यात

आला होता. 'शिक्षणाने अस्पृश्य-आदिवासींच्या जीवनात परिवर्तन करू पाहणाऱ्या सयाजीरावांचा हा जगातील आणि हिंदुस्थानातील पहिला क्रांतिकारक निर्णय होता.'[११] त्यावेळी महाराजांचे वय फक्त एकोणीस वर्षांचे होते हे लक्षात घेतले पाहिजे. सामाजिक समता व अस्पृश्योद्धारासाठी ते फक्त शिक्षणप्रसार आणि वसतिगृह इतक्याच सुधारणांवर ते थांबले नाही. इ.स. १८८३ साली अस्पृश्योद्धाराचा कायदा पास केला[१२] इ.स. १८९२ साली त्यांनी सक्तीचे आणि मोफत शिक्षण सुरु केले. सक्तीच्या शिक्षणाची हिंदुस्थानातील ही पहिली सुरुवात होती. समाजसुधारणेचे निरुपद्रवी आणि तितकेच प्रभावी साधन म्हणून 'शिक्षण' या घटकाकडे पाहणाऱ्या महाराजांमध्ये सयाजीराव यांचा अग्रक्रम आहे.

समाजातील जातिभेद कायद्याने नष्ट होणार नाही. त्यासाठी कृतीशील समाजजागृती करणे गरजेचे होते. 'महाराजांनी 'विशेष विवाह कायदा' केला त्यानुसार हिंदु धर्मात राहून भिन्नजातीमधील विवाह करता येण्याची ती परवानगी होती ज्या दिवशी महाराजांनी कायद्यावर सही केली, त्या दिवशी सर्व जातींच्या लोकांनी सहभोजनात भाग घेतला.'[१३] या कायद्याद्वारे शतकानुशतके अस्तित्वात असलेल्या जातिबंदिस्त विवाह परंपरेवर त्यांनी हल्ला केला. महाराजांचा हा निर्णय क्रांतिकारी म्हटला पाहिजे. जातिधर्मातील पंक्तिभेद दूर करण्यासाठी त्यांनी स्वत:पासून प्रारंभ केला. अशा प्रकारे रोटी-बेटी व्यवहारातील भेदाभेद नष्ट करण्यासाठी त्यांनी टाकलेले पाऊल अतुलनीय होते. ईश्वरासमोर सर्व समान आहेत आणि म्हणून सर्वांना ईश्वर भजण्याचा समान अधिकार असला पाहिजे. हे उदात्त विचार प्रत्यक्षात आणण्याचे श्रेयही महाराजांनाच जाते. 'महाराजांनी आपले खंडोबाचे मंदिर अस्पृश्यांना खुले केले.सर्व सरकारी मंदिरात मंदिरप्रवेश खुला केला. १९२१ साली आर्य समाजाने महाराजांच्या या कामगिरीबद्दल 'पतितपावन' ही उपाधी देऊन त्यांचा गौरव केला.'[१४] डॉ. आंबेडकरांच्या नाशिक येथील आंदोलनाच्या आधीच बडोद्यात महाराजांनी मंदिरप्रवेश सर्वांसाठी खुला केला होता. यावरून त्यांचा समतावादी दृष्टीकोन दिसतोच शिवाय; विद्रोही कृतिशीलता लक्षात येते. डॉ. आंबेडकरांना परदेशात उच्च शिक्षण ते बडोद्यात नोकरी इत्यादीच्या मागे महाराजांचे सहकार्य असल्याचे सर्वश्रुत आहेच. महाराजांच्या शब्दात सांगायचे तर, "अस्पृश्यवर्गीय पुढारी डॉ. आंबेडकर यांना शिक्षणासाठी आम्हीच मदत केली. अमेरिकेतील उच्चशिक्षण माझे खर्चाने दिले. ते परत आल्यानंतर बडोद्यात नोकरी दिली होती; परंतु त्यांना राहावयास घरासंबंधी अडचण आल्यामुळे ते मुंबईस गेले ते गेल्यामुळे त्यांच्यावर आमचा रोष न राहता आम्हास आनंदच झाला. कारण ते शिकून शहाणे होऊन आपल्या समाजाच्या उद्धाराचे काम करत आहे. ते बघून आमचा हेतू सफल झला असेच आम्हाला वाटते."[१५] अस्पृश्यता निवारण हा महाराजांच्या जिव्हाळयाचा विषय होता. त्यासाठी त्यांनी केवळ विचार व्यक्त केले नाहीत तर; प्रत्यक्ष कार्य केल्याचे दिसून येते.

## निष्कर्ष :-

महाराजा सयाजीराव गायकवाड हे सुधारणावादी विचारांचा राजे होते. शिक्षणप्रसारातून त्यांनी सामाजिक न्यायाची बांधणी केली. सर्वांसाठी शिक्षण आणि राष्ट्रीय उन्नती हे त्यांचे ध्येय होते. सर्वप्रकारच्या विषमता नष्ट करून समता निर्माण करण्याची त्यांची मनीषा होती. जातिभेदाचा चिकित्सक विचार करून त्यातील तथ्यहीनता आणि कृत्रिमता त्यांनी तार्किकतेने स्पष्ट केली होती. अस्पृश्यतेच्या प्रथेविरुद्ध त्यांनी आवाज उठवला. ही अमानुष प्रथा नष्ट करण्यासाठी त्यांनी वैचारिक भूमिकेतून आणि कृतीतून योगदान दिले. आपल्याच संस्थानात अनेक कालबाह्य रूढी- परंपरांना तिलांजली देऊन कायद्याद्वारे आदर्श समाज उभा करण्याचा आतोनात प्रयत्न त्यांनी केला. त्यांच्या सामाजिक सुधाणेचा पाया आधुनिकता, चिकित्सक वृत्ती आणि विज्ञानवाद या त्रिसूत्रावर उभा होता. अर्थात त्याच्या मुळाशी मानवतावादी आणि समतावादी विचारांची पक्की बैठक होती. कालबाह्य झालेल्या परंपरांना नाकारून नवतेचा स्वीकार करण्याचा कणखरपणा त्यांच्यात होता. विचारांना कृतीची जोड देऊन सामाजिक बदल घडवू पाहण्याचा निर्भयपणा त्यांच्या विचारात आणि कार्यात दिसतो. त्यामुळे महाराज सयाजीराव यांचे विचार आणि कार्य महत्वाचे ठरतात

**संदर्भ आणि टिपा:**

१. निंबाजीराव पवार, जेव्हा गुराखी राजा होतो राजहंस प्रकाशन, पाचवी आवृत्ती, २००८, पुणे, पृ. ६१.

२. सयाजीराव गायकवाड, सयाजीराव गायकवाड यांची भाषणे, खंड ५, संपा. डॉ. रमेश वरखेडे, साकेत प्रकाशन, पहिली आवृत्ती, २०१४, पृ. ६३.

३. बाबा भांड, लोकपाळ राजा सयाजीराव, साकेत प्रकाशन, पहिली आवृत्ती,औरंगाबाद, २०१३, पृ. ६९.

४. सयाजीराव गायकवाड यांची भाषणे, खंड १, दुसरी आवृत्ती, संपा. रमेश वरखेडे, साकेत प्रकाशन, पुणे, २०१३, पृ. ५१.

५. गो. मा. पवार, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे जीवन व कार्य, पहिली आवृत्ती,लोकवाङ्मय गृह, मुंबई २००४, पृ. २१७.

६. सयाजीराव गायकवाड, सयाजीराव गायकवाड यांची भाषणे, खंड ५, संपा. डॉ. रमेश वरखेडे, साकेत प्रकाशन, पहिली आवृत्ती, २०१४, पृ. ५५.

७. कित्ता, पृ. ६६.

८. निंबाजीराव पवार, जेव्हा गुराखी राजा होतो पूर्वोक्त, पृ. ९७.

९. सयाजीराव गायकवाड, सयाजीराव गायकवाड यांची भाषणे, खंड ५, पूर्वोक्त, पृ. १३९.

१०. कित्ता, पृ. १६०.

११. बाबा भांड, लोकपाळ राजा सयाजीराव, पूर्वोक्त, पृ. ३९.

१२. कित्ता, पृ. ७०.

१३. कित्ता, पृ. ४८.

१४. निंबाजीराव पवार, जेव्हा गुराखी राजा होतो पूर्वोक्त, पृ. १८.

१५. बाबा भांड, लोकपाळ राजा सयाजीराव, पूर्वोक्त, पृ. २०४.